राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ

RASHTRASANT
TUKADOJI MAHARAJ
NAGPUR UNIVERSITY

(Established by Government of Central Provinces Education Department by Notification No. 513 dated the 1st August, 1923 & presently a State University governed by Maharashtra Universities Act, 1994)

सामान्य परीक्षा विभाग) (Office of the General Examinations

Pariksha Bhawan, L.I.T. Premises, Amravati Road, Nagpur- 440 033

Fax. No. (0712) 2531244 Tel. No. (O) (0712) 2531244

क्र. रातुमनावि/सा.प./२०१५–१६/३७७ दिनांक: २७ एप्रिल, २०१६

# अधिसुचना

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठाची बी.एस.सी. प्रथम तृतीय व पाचवे सत्राची परीक्षा दिनांक ०६ मे, २०१६ पासून सुरु होत असून प्रथम सत्र व तृतीय सत्र हिवाळी २०१५ परीक्षेचे निकाल जाहीर करण्यात आलेले असून या परीक्षेतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे उन्हाळी २०१६ परीक्षांचे प्रवेश अर्ज ऑनलाईन पध्दतीने जनरेट करुन किंवा काही तांत्रिक अडचणीमुळे जनरेट न झाल्यास दिनांक ३०.०४.२०१६ पर्यंत ऑफलाईन फॉर्म मॅन्युअल पध्दतीने स्विकारुन महाविद्यालयाने दिनांक ०२ मे, २०१६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत परीक्षा विभागात निर्धारित परीक्षा शुल्कासह त्वरित सादर करावे. जेणेकरुन विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रे वेळेवर निर्गमित करणे शक्य होईल. त्यानंतर विलंबाने येणारे परीक्षा आवेदनपत्र कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. ऐनवेळी प्राप्त झालेल्या कोणत्याही तक्रारीवर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही व अशा परीस्थितीत एखादा विद्यार्थी परीक्षेपासून वंचित झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची/संचालकांची/विभाग प्रमूखांची राहील.

तसेच वरील परीक्षांचे प्रवेशपत्र व अटेंडंस शिट हे college.rtmnuresults.org हया संकेत स्थळावर ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध राहील. ज्या महाविद्यालयांना सदर संकेत स्थळाचा लॉगीन व पासवर्ड उपलब्ध नसेल अशा महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी ०७१२–६४६८५०६ हया दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून आपला लॉगीन व पासवर्ड प्राप्त करुन घ्यावा. हया परीक्षांच्या कंट्रोल शिट हया मॅन्युअले पध्दतीने केंद्र प्रमूखांना मिळतील, याची कृपया नोंद घ्यावी.

संबंधित विद्यार्थ्यांनी त्यांच्या परीक्षा केन्द्रावर ओळखपत्राच्या अनुषंगाने आपले फोटो परिचय पत्र सोबत ठेवावे, जेणेकरुन कुठल्याही प्रकारची अडचण परीक्षा देतेवेळी निर्माण होणार नाही, याची नोंद घ्यावी.

मा. प्र–कुलगुरु यांचे आदेशानुसार,

Kim

परीक्षा नियंत्रक